पनवेल (प्रतिनिधी) अनिकेत बालगृहातील विद्यार्थ्यांना अचानकपणे बंदी घालत प्रवेश नाकारण्यात आल्याने या बालगृहात पुन्हा अनाथ विद्यार्थ्यांना प्रवेश देवून बालगृह कायम सुरू ठेवावे, या मागणीसाठी नविन पनवेलमध्ये असलेल्या आर.झुनझुनवाला फांऊडेशनच्या अनिकेत बालगृहात आज आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यवस्थापनाला धारेवर धरत हल्लाबोल केला.

यावेळी वरिष्ठ पोलीस निरिक्षक जे.आर.थोरात, पनवेल शहर कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, नगरसेवक प्रकाश विनेदार, लतीफ शेख, माजी नगरसेविका शशिकला सिंह, नगरसेविका संगिता कांडपाल, स्मिता पाटील, नविन पनवेल शिवसेना ग्राहक कक्ष प्रमुख किरण तावदारे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आनंद भंडारी, खारघर कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष सुनिल सावर्डेकर, पनवेल शहर सरचिटणीस रमेश देशमुख, एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, राज सदावते विलास भगत, संजय ननावरे, नागेश शेट्टी, किसन पवार, रेखा दांडेकर यांच्यासह पाल्य आणि पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

क्षुल्लक कारणांवरून हे बालगृह बंद झाल्यास आर्थिक दृष्टया मागासलेल्या पालकांच्या मुलांवर अन्याय होणार आहे तसेच त्या पाल्यांचे भविष्यही धोक्यात येणार आहे. व्यवस्थापने अचानक बालगृह बंद करण्याचा निर्णय घेतल्याने विद्यार्थ्यांना नवीन संस्थांमध्ये शिक्षणासाठी प्रवेश मिळणार नाही व मोठी समस्या उदभवेल. यासाठी महिला व बाल कल्याण मंत्री वर्षाताई गायकवाड यांच्याकडे विनंती करून हे बालगृह सुरू ठेवण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्पष्ट केले. शासनाकडून जागेसह देण्यात येणाऱ्या सर्व सोयीसुविधांचा फायदा घेवून व्यवस्थापनाने हे बालगृह बंद करून टेलरिंग सारखे उद्योग सुरू केले आहे. शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवून व्यवस्थापनाने येथे आपली मुजोरी चालवली आहे. याला आळा घालण्यासाठी आठवडयाभरात सकारात्मक निर्णय घेतला नाही तर अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन करणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

नविन पनवेलमधील सेक्टर ५ए, प्लॉट नं.१३ येथे असलेल्या अनिकेत बालगृहामध्ये एकूण ९० अनाथ विद्यार्थी रहात आहेत. व्यवस्थापनाच्या जाणिवपूर्वक दुर्लक्षामुळे मुलांना योग्य त्या सोयी-सुविधा मिळत नसल्याने सदरचे बालगृह बंद करण्यात यावे असे आदेश बालगृह समितीच्या अध्यक्षा मनिषा तुळपुळे यांनी दि.१६ एप्रिल २०१४ रोजी अनिकेत बालगृहाच्या संचालकांना दिलेला आहे.परंतू वास्तविक या संस्थेने शासनाकडून सोयीसुविधांचा फायदा घेतला असून सर्व स्थिती पहाता या बालगृहाचे व्यवस्थापन स्वतःच्या स्वार्थापोटी पाल्यांना नाहक त्रास देण्याचा प्रयत्न करीत आहे. पाल्यांच्या भवितव्याचा विचार करता हे बालगृह पूर्ववत चालू होण्यासाठी सर्वत्तोपरी प्रयत्न करणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी आवर्जून नमूद केले असून आमदार प्रशांत ठाकूर यांनी वेसण आवळल्याने व्यवस्थापनाने एक पाऊल मागे घेत सहकार्याची भुमिका दर्शवली आहे.